# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेड

(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय)

**CIN : U45200 MH 1974 SGC 017206**

एफडीसीएम भवन, ३५९-बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर-४४००३६

Email: md@fdcm.nic.in, gm.hq@fdcm.nic.in


## घोषणा

विषय : मागासवर्गीय उमेदवारांनी सवलतीची फी भरली असली तरी खुल्या प्रवर्गाच्या पदासाठी विचार होणेबाबत.

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड मधील सहाय्यक व्यवस्थापक व वनपरिक्षेत्र अधिकारी या संवर्गाच्या पदभरतीची जाहीरात दिनांक १०.०२.२०१८ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्दी करण्यात येवून मे.महाऑनलाईन कंपनी यांचे संकेत स्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेत. याबाबतची सविस्तर जाहिरात एफडीसीएम लिमिटेडच्या www.fdcm.nic.in व महा ऑनलाईनच्या https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर जाहिरातीतील बाब क्रमांक ३.१० मध्ये खालीलप्रमाणे तरतुद विहीत करण्यात आली होती.

"३.१० परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर मागासवर्गीयांसाठी विहित केलेली वयोमर्यादा, शुल्क तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषांसंदर्भात कोणतीही सूट/सवलत घेतली असल्यास, अशा उमेदवारांची अमागास (सर्वसाधारण) पदावर निवड करण्यात येणार नाही."

२. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांनी त्यांचे https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर "मागासवर्गीय उमेदवारांनी सवलतीची फी भरल्यास त्यांचा विचार त्यांच्या प्रवर्गातील राखीव पदाबरोबरच खुल्या प्रवर्गातील पदासाठीही करण्यात येईल. केवळ सवलतीची फी भरल्याच्या कारणास्तव, त्यांना खुल्या पदांकरीता अपात्र समजले जाणार नाही" असे घोषणापत्र प्रसिध्द केले आहे.

वरील घोषणापत्रानुसार उमेदवार व इतर संबंधिताचा संभ्रम दुर करण्यासाठी आता याद्वारे स्पष्ट करण्यात येते आहे की, फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेडच्या सहाय्यक व्यवस्थापक व वनपरीक्षेत्र अधिकारी या पदांच्या परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर मागासवर्गीयांसाठी विहित केलेली वयोमर्यादा, शुल्क तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषासंदर्भात कोणतीही सुट/सवलत घेतली असली तरी अशा उमेदवारांची अमागास (सर्वसाधारण) पदावर निवडीकरीता विचार करण्यात येईल."

**स्वाक्षरी**
**व्यवस्थापकीय संचालक**